Since 1917

**THE KARAD URBAN CO-OPERATIVE BANK LTD., KARAD**
(SCHEDULED BANK)

Centenary Celebrated Bank

**Ref. No. HO/LOAN/103/2020-21/** **Date : 01/06/2020**

**प्रति,**

____________________________

____________________________

**विषय : मुदत कर्ज हप्ता व व्याज परतफेडीसाठी दिलेल्या विशेष मुदतीबाबत.**

**संदर्भ : हप्ता व व्याज भरण्यास विश्रांती कालवधी दिल्याबाबतचे दि.३ एप्रिल २०२० रोजीचे पत्र.**

**महोदय,**

COVID-19 या कोरोना विषाणूच्या संसर्गामुळे भारतभर सुरू असलेल्या लॉकडाऊनला ७० दिवसांपेक्षा अधिक काळ झाला आहे. जीवनावश्यक गोष्टी वगळून या काळात सर्वच उद्योगधंदे, व्यापार, कार्यालये, सेवा बंद आहेत. त्यामुळे अर्थचक्र ठप्प झाले आहे. याचा सम्यक विचार करून विशेष बाब म्हणून रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने प्रथम तीन महिन्यासाठी (१ मार्च ते ३१ मे २०२०) आणि आता आणखी तीन महिने (१ जून ते ३१ ऑगस्ट २०२०) हप्ते व व्याज भरण्यास विश्रांती कालावधी (Moratorium Period) देऊन कर्जाची मुदत सहा महिन्याने वाढवावी असे सूचित केले आहे. त्यानुसार बँकेच्या मा.संचालक मंडळाने मुदत कर्जासाठी देय असलेले हप्ते व व्याज परतफेडीसाठी विश्रांती कालावधी (Moratorium Period) बाबत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्याचे निश्चित केलेले आहे –

१. मुदत कर्जखात्यांना यापूर्वी दि.१ मार्च २०२० ते दि.३१ मे २०२० या तीन महिन्यांच्या कालावधीतील देय होत असलेले हप्ते व व्याज परतफेडीसाठी तीन महिने विश्रांती कालावधी (Moratorium Period) देण्यात आलेला आहे. रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांनी सूचित केलेनुसार दि.१ जून २०२० ते दि.३१ ऑगस्ट २०२० या आणखी तीन महिन्यांच्या म्हणजेच एकत्रित सहा महिन्यांच्या (दि.१ मार्च ते ३१ ऑगस्ट २०२०) कालावधीत देय होत असलेले हप्ते व व्याज परतफेडीसाठी विश्रांती कालावधी (Moratorium Period) देण्यात येईल, परिणामी कर्जपरतफेडीची मुदत सहा महिन्यांनी वाढेल.

२. दि.२९ फेब्रुवारी २०२० रोजीच्या कर्ज परतफेड तक्त्यानुसार (Repayment Schedule) असणारी बाकी आणि सहा महिन्यांचा विश्रांती कालावधी विचारात घेऊन होणाऱ्या व्याजाची रक्कम एकत्रित करून मुद्दल निश्चिती करण्यात येईल. त्यानुसार दि.३१ ऑगस्ट २०२० नंतर कर्जाचा उर्वरित कालावधी (विश्रांती कालावधीसह) विचारात घेऊन कर्ज परतफेडीसाठी हप्त्यांची पुनर्रचना केली जाईल. परिणामी हप्त्यामध्ये अल्पशा रक्कमेने वाढ होईल. त्यास अनुसरून सप्टेंबर २०२० पासून नवीन मुद्दल हप्ता आणि दरमहा होणाऱ्या व्याजाची नियमितपणे परतफेड करण्याबाबत योग्य ते आर्थिक नियोजन करावे.

३. दि.१ मार्च २०२० ते दि.३१ ऑगस्ट २०२० या सहा महिन्यांच्या विश्रांती कालावधीमध्ये आपण मुदत कर्जखाती रक्कम जमा केल्यास ती फेब्रुवारी २०२० रोजी थकबाकी असल्यास त्यामधून कमी केली जाईल किंवा फेब्रुवारी २०२० रोजी थकबाकी नसल्यास सदरची रक्कम सप्टेंबर २०२० पासूनच्या हप्त्यांमधून कमी करण्यात येईल.

४. **आपल्याला मुदत कर्जावरील हप्ता व व्याज भरणेसाठी विशेष बाब म्हणून विश्रांती कालावधीची आवश्यकता नसल्यास आणि आपण नियमित हप्ता व व्याज भरणार असल्यास, याबाबत संबंधित शाखेस तशी कल्पना द्यावी; जेणेकरुन याबाबत उचित कार्यवाही करणे सोईचे होईल.**

माहे फेब्रुवारी २०२० अखेरचे देय असणारे सर्व हप्ते नियमित भरले असतीलच. परंतु काही कारणाने फ्रेबुवारी २०२० अखेर आपण कर्जाचे हप्ते भरू शकला नसाल तर ती रक्कम सत्वर भरण्याची व्यवस्था करावी, म्हणजे भविष्यात अतिरिक्त आर्थिक ताण आपल्यावर येणार नाही.

सदरच्या पत्रात नमूद केलेल्या कार्यवाहीमध्ये काही बदल/सुधारणा झाल्यास आपणास कळविण्यात येईल. आपल्याला सदर कार्यवाहीबाबत काही शंका/अडचणी असतील तर, श्री.गिरीश सिंहासने (महाव्यवस्थापक, कर्ज व जोखीम व्यवस्थापन विभाग) यांच्याशी भ्रमणध्वणी क्र.७३५०० १०७२२ वर संपर्क साधावा, ही विनंती.

Karad Urban Co-operative Bank Ltd. Registration No. Code No.0 Scheduled Bank HEAD OFFICE, KARAD

**आपला स्नेहांकित,**

**(सीए. दिलीप गुरव)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**

**मुदत कर्ज खात्यावरील व्याज व हप्ता भरण्यासाठी दिलेल्या विश्रांती कालावधीच्या (Moratorium) सवलतीची आवश्यकता आहे / आवश्यकता नाही.**

**कर्ज खातेदाराची सही–** __________________



Scanned by CamScanner